॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २९ - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील पंडित दीनदयाल उपाध्याय अध्यासन केंद्र तर्फे "एकात्म मानव दर्शन" या विचारांवरील व्याख्यानांच्या हिरक महोत्सवानिमित्त दि. २५ सप्टेंबर रोजी, पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जयंती दिनाचे औचित्यसाधून विद्यापीठातील रसायन तंत्रज्ञान संस्था व रसायनशास्त्र प्रशाळा याठिकाणी व्याख्यान आयोजित करण्यात आले.

सकाळसत्रातील व्याख्यानात विद्यापीठातील रसायनशास्त्र प्रशाळेत प्रा. डॉ. विवेक काटदरे यांनी 'एकात्म मानव दर्शनः एकात्मिक पालकत्व' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी आजच्या युवा पिढीच्या जबाबदाऱ्या, कर्तव्य पार पाडण्याचे महत्त्व, जीवनातील यशस्वी वाटचाल तसेच विकसित भारत घडविण्याच्या दृष्टीने युवांनी घ्यायची भूमिका स्पष्ट केली. एकात्मिक पालकत्वाच्या संकल्पनेत शरीर, मन, चारित्र्य, जोडीदार, आई-वडील, कुटुंब, समाज आणि निसर्ग या आठ क्षेत्रांमध्ये जागरूकतेने आपली जबाबदारी पार पाडण्याचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी रसायनशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. दीपक दलाल अध्यक्षस्थानी तर डॉ. अमर पाटील हे समन्वयक म्हणून उपस्थित होते. मुंबई येथे एप्रिल १९६५ मध्ये पंडितजींनी दिलेल्या 'एकात्म मानव दर्शन' या ऐतिहासिक व्याख्यानांना यंदा ६० वर्षे पूर्ण झाली. या अनुषंगाने यावर्षी हिरक महोत्सव साजरा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमामध्ये अध्यासन केंद्राचे प्राध्यापक प्रा. प्रमोद माहुलीकर यांनी पंडित उपाध्यायांचे जीवन, कार्य व 'एकात्म मानव दर्शन' या संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट केले.

दुसरे व्याख्यान  रसायन तंत्रज्ञान संस्था (यु.आय.सी.टी.) येथे झाले. संगणक शास्त्र प्रशाळेचे प्रा. रामचंद्र भावसार यांनी "भारतीय ज्ञान प्रणाली" (Indian Knowledge System) या विषयावर सखोल विवेचन आपल्या व्याख्यानात केले. त्यांनी भारत देश प्राचीन काळापासून ज्ञानाच्या क्षेत्रात अग्रेसर असल्याचे संदर्भासह स्पष्ट करत भारतीय ज्ञान परंपरा, प्राचीन प्रशासकीय पद्धती व सामाजिक कार्यपद्धतींचा आजच्या काळातील उपयोग कसा होऊ शकतो, यावर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विशेषतः युवापिढीने या परंपरेचा सखोल अभ्यास करून विकसित व आत्मनिर्भर भारत घडविण्यासाठी आणि संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी त्याचा उपयोग करावा असे सांगितले. यावेळी  संचालक प्रा. अजयगिरी गोस्वामी, प्रा. आर. एस. सिरसाम, प्रा. उज्वल पाटील, डॉ. भूषण चौधरी यांच्यासह सर्व शिक्षक उपस्थित होते.

**बातमी क्रमांक २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २९ - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्राध्यापकांसह संशोधक विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण ठरणारे शिक्षक प्रतिवादनशीलता मूल्यांकन शोधिका (टीचर असर्टिव्हनेस असेसमेंट इन्व्हेंटरी (TAAI) या नवीन संशोधन साधनास भारत सरकारकडून कॉपीराइट प्राप्त झाले आहे. हे संशोधनपर साधन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील शिक्षणशास्त्र विभागाच्या संशोधन केंद्रातील संशोधक विद्यार्थी डॉ. संतोष कोळी, चाळीसगाव एज्युकेशन सोसायटीचे बी.पी. आर्ट्स, एस.एम.ए. सायन्स आणि के.के.सी. कॉमर्स कॉलेजचे सहयोगी प्राध्यापक डॉ. पंकजकुमार नन्नवरे आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशाख विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. संतोष खिराडे या चमुने विकसित केले आहे.

टीचर असर्टिव्हनेस असेसमेंट इन्व्हेंटरी हे साधन शिक्षकांचे संवाद कौशल्य, वर्ग व्यवस्थापन, संघर्ष निराकरण आणि निर्णय घेण्याच्या क्षमतेचे परीक्षण करते. यात ४४ विधानांचा समावेश असून त्यात सकारात्मक व नकारात्मक दोन्ही प्रकारची विधाने आहेत. याच्या विश्वसनीयता व वैधतेसाठी जळगाव जिल्ह्यातील ९०१ शिक्षकांच्या नमुन्यावर संशोधन करण्यात आले. स्प्लिट-हाफ पद्धतीनुसार साधनाचा विश्वसनीयता गुणांक ०.८४, क्रॉनबॅच अल्फा गुणांक ०.८२ व टेस्ट-रिटेस्ट गुणांक ०.८३ इतका आढळला. या आकडेवारीवरून हे साधन विश्वसनीय ठरले आहे.

या यशाबद्दल विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. एस. टी. भुकन, आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळेच्या संचालिका डॉ. मनीषा इंदाणी व प्राचार्य डॉ. मिलिंद बिल्दीकर यांनी संपूर्ण संशोधक टीमचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

या साधनाचा उद्देश शिक्षकांना स्वतःच्या प्रतिपादनशीलतेचे मूल्यमापन करून वर्गातील वातावरण सकारात्मक बनविण्यास मदत करणे आहे. यामुळे शिक्षकांची संवाद कौशल्ये सुधारतील, विद्यार्थ्यांशी संबंध अधिक दृढ होतील तसेच व्यावसायिक विकासालाही चालना मिळेल. हे साधन शिक्षक प्रशिक्षण संस्था, इन-सर्व्हिस ट्रेनिंग प्रोग्राम आणि विविध मूल्यमापन प्रक्रियांमध्ये उपयुक्त ठरणार आहे.

या संदर्भात डॉ. संतोष खिराडे यांनी सांगितले की, "हे साधन शिक्षकांना स्वतःच्या सामर्थ्य आणि कमकुवत बाजू ओळखण्यास मदत करेल. त्यामुळे शिक्षण प्रक्रिया अधिक प्रभावी आणि विद्यार्थी-केंद्रित होईल."कॉपीराइट प्राप्त झाल्यामुळे हे साधन अधिकृतरित्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रासाठी उपलब्ध होणार असून, शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाच्या दिशेने हे एक नवीन पाऊल पडले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ — दिनांक: २७ सप्टेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता